05 MAR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पेटंटधारक गायत्री गोखलेला 'पेटंट ॲम्बॅसिडर' नेमावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पेटंटप्राप्त संशोधकांबरोबर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थी दशेतच पेटंट प्राप्त करण्याची कामगिरी करणाऱ्या गायत्री गोखले या विद्यार्थिनीस विद्यापीठाची पेटंट ॲम्बॅसिडर म्हणून नियुक्त करावे. तिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांतही संशोधन आणि पेटंटप्राप्ती या विषयी जागृती करावी, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेजेसच्या वतीने आयोजित पेटंटप्राप्त शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी यांचा गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत विद्यापीठातील संशोधकांना २५ पेटंट प्राप्त झाले आहेत.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पेटंट मिळणे विद्यापीठाची संशोधकीय कामगिरी उंचावत असल्याचे लक्षण आहे. शिक्षक आणि संशोधकांनी पेटंट मिळविणारी कामगिरी करणे अपेक्षितच आहे. विद्यापीठात बी.टेक.च्या तृतीय वर्षात शिकणाऱ्या गायत्री गोखले हिला स्थानिक स्रोतांपासून तेथील समस्या सोडविण्याचे संशोधन करावेसे वाटले. यामध्ये पेटंट मिळविण्याची तिची कामगिरी आदर्शवत आहे. तिला विद्यापीठाची पेटंटदूत केल्यास विद्यार्थ्यांमध्ये क्रमिक अभ्यासाच्या पलिकडे जाऊन मूलभूत संशोधन करण्याची ऊर्मी जागृत होईल. पेटंटप्राप्त शिक्षकांनीही आपल्यातील एकेका शिक्षकाला संशोधनाला पेटंट प्राप्त करण्याच्या तांत्रिकतेविषयी अवगत करावे. महाविद्यालयीन शिक्षकांमध्येही या अनुषंगाने जागृती करणे आवश्यक आहे.

पेटंटप्राप्त शिक्षकांच्या वतीने डॉ. जी.बी. कोळेकर, डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. माधुरी वाळवेकर, हर्षवर्धन पंडित, डॉ. जे.बी. यादव आणि गायत्री गोखले यांनी मनोगत व्यक्त केले. पेटंटप्राप्तीची कामगिरी करणाऱ्यांमध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. एन. सपली, डॉ. एस. पी. हांगिरगेकर, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. ए. के. साहू, डॉ. एस. बी. चव्हाण, सी. जे. आवटी, हर्षवर्धन पंडित, श्रेया पंडित, डॉ. जे. बी. यादव, डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. के. डी. पवार, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. सचिन पन्हाळकर, आर. जे. धाबर्डे, एच. ए. तिरमारे, श्रीपाल गायकवाड आणि गायत्री गोखले यांचा समावेश आहे. इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

पेटंटप्राप्त संशोधकांना कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथभेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बौद्धिक संपदा हक्क कक्षाचे प्रमुख डॉ. एस. बी. सादळे आदी उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024
लोकमत

# विद्यापीठात आज राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : हिंदी साहित्यातील सुप्रसिद्ध व्यंगकार हरिशंकर परसाई यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात हिंदी विभागाच्या वतीने आज, मंगळवारी एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यात 'हरिशंकर परसाई यांच्या साहित्यातील व्यंगाचे विविध पैलू' या विषयावर मांडणी होणार आहे. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. सुरेश माहेश्वरी (अमळनेर) यांच्या हस्ते होणार आहे. प्राध्यापक, संशोधक विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्र. विभागप्रमुख डॉ. ए. एम. सरवदे यांनी केले.

05 MAR 2024

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात मल्लखांबपटूंनी सादरीकरण केले.

# विद्यापीठात मर्दानी खेळांचा अभ्यासक्रम

## डी. टी. शिर्के : शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मर्दानी खेळांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी केली.

विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर चार दिवसीय शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाला प्रारंभ झाला. त्याच्या उद्‌घाटन समारंभात ते बोलत होते.

क्रिकेट, बास्केटबॉल, रस्सीखेच, बॅडमिंटन, कबड्डी, बुद्धिबळ, ॲथलेटिक्स आणि मॅरेथॉन या क्रीडा प्रकारांत होणाऱ्या स्पर्धेत विद्यापीठ कॅम्पसवरील १७५० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत.

डॉ. शिर्के म्हणाले, शिवकालीन मर्दानी प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुढील वर्षीपासून आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने पदविका आणि पदवी अशा पद्धतीने त्याचा विकास करण्याचा मानस आहे. खेलो इंडिया स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारांत पदक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते क्रीडाज्योत समारंभस्थळी आणण्यात येऊन कुलगुरूंच्या हस्ते तिची प्रतिष्ठापना करण्यात आली.

यावेळी गारगोटी तालुक्यातील वेणुग्राम येथील सव्यसाची गुरूकुलमच्या पथकाने लखन जाधव, श्रीकांत लुगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवकालीन मर्दानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके सादर केली. विद्यापीठाच्या जिम्नॅस्टीक्स, मल्लखांब, योगा, बॉक्सिंग आणि धनुर्विद्येच्या संघातील खेळाडूंनीही नेत्रदीपक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. डॉ. एन. डी. पाटील आणि किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024
लोकमत

# समन्वयकपदी डॉ. गजानन राशनकर यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील औद्योगिक रसायनशास्त्र विभागाच्या समन्वयकपदी प्रा. डॉ. गजानन राशनकर यांची सोमवारी नियुक्ती करण्यात आली. याआधी या विभागाची जबाबदारी प्रा. डॉ. डी. एम. पोरे यांच्याकडे होती. त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ संपल्याने या विभागाच्या समन्वयकपदी डॉ. गजानन राशनकर यांची नियुक्ती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024
लोकमत

# ऋतिका धनगरचा उत्कृष्ट युवा संसदरत्न पुरस्काराने गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

हुपरी : संसदेतील कामकाजाचा युवा पिढीलाही अनुभव असावा यासाठी सहा विद्यापीठांतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पट्टणकोडोली (ता. हातकणंगले)च्या ऋतिका बिरू धनगर हिला 'उत्कृष्ट युवा संसदरत्न' पुरस्कार देऊन गौरविले. संसदीय कामकाजमंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला.



महाराष्ट्रातील शिवाजी विद्यापीठातील ८ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेली ऋतिका विद्यापीठात एम.एस्सी. गणित विषयाचे शिक्षण घेत आहे. बँकिंग क्षेत्रात उच्चपदावर काम करण्यासाठी ती परिश्रम घेत आहे. देशाच्या सार्वभौम संसद कामकाजाचा युवा पिढीलाही अनुभव असावा यासाठी केंद्र सरकारच्यावतीने गेल्या तीन वर्षांपासून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. ऋतिकाने सत्ताधारी गटामधून शिक्षणमंत्री या पदावर उल्लेखनीय व प्रभावी असे काम यावेळी केले. विरोधकांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना तिने खंबीरपणे व सडेतोड उत्तरे देऊन विरोधकांचे समाधान केले. तिच्या याच कार्याची दखल घेऊन तिला 'उत्कृष्ट युवा संसदरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल खासदार धैर्यशील माने, धनंजय महाडिक,आमदार प्रकाश आवाडे,माजी खासदार राजू शेट्टी आदींनी ऋतिका हिचे कौतुक केले आहे.

0 5 MAR 2024 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा गोखले इन्स्टिट्यूटसमवेत सामंजस्य करार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**कोल्हापूर :** धोरणनिश्चितीच्या कार्यात सहभागाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील संशोधक, अभ्यासकांना माहिती होण्याच्या दृष्टीने गोखले इन्स्टिट्यूटसमवेत होणारा सामंजस्य करार उपयुक्त ठरेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केला.

पुणे येथील नामांकित गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, गोखले इन्स्टिट्यूटचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत बनसोडे उपस्थित होते.

डॉ. प्रशांत बनसोडे म्हणाले, दोन्ही संस्थांना संयुक्तरित्या संशोधन समस्येची निवड करून त्यावर काम करता येईल.

गेल्या पाच वर्षांत संस्थेने विविध ४० संशोधन प्रकल्प मार्गी लावले आहेत.

करारावर गोखले इन्स्टिट्यूटच्या वतीने डॉ. बनसोडे यांनी तर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. पूजा पाटील, कोमल ओसवाल, आकाश ब्राह्मणे आदी उपस्थित होते.

05 MAR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात लवकरच मर्दानी खेळांचा अभ्यासक्रम

## कुलगुरू डॉ. शिर्के यांची घोषणा; 'शिवस्पंदन' वार्षिक क्रीडा महोत्सवास प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा


शिवाजी विद्यापीठात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मर्दानी खेळांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली.

क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर सोमवारपासून चारदिवसीय शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवकालीन मर्दानी खेळांची परंपरा महाराष्ट्राच्या भूमीत पूर्वापार रुजली आहे. पुरुषांमध्ये कौशल्य आणि महिलांमध्ये आत्मसन्मान व स्वसंरक्षण या भावना रुजविण्याच्या दृष्टीने या खेळांना वर्तमानामध्ये महत्त्व आहे. त्या दृष्टीने पुढील वर्षापासून प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने पदविका आणि पदवी अशा पद्धतीने त्याचा विकास करण्याचा मानस आहे. खेलो इंडिया स्पर्धेत विविध क्रीडाप्रकारांत पदक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते क्रीडाज्योत समारंभस्थळी आणण्यात येऊन कुलगुरूंच्या हस्ते तिची प्रतिष्ठापना करण्यात आली. स्पर्धेत वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, ऊर्जासंवर्धन, वनसंवर्धन, विकसित भारत, शेतकरी आत्महत्यामुक्ती, विविधतेतून एकता, शाश्वत विकास अशा विविध सामाजिक विषयांवरील जागृतीपर फलक घेऊन खेळाडू संचलनात सहभागी झाले. इतिहास अधिविभागाची शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त खेळाडू स्वप्नाली वायदंडे हिने खेळाडूंना शपथ दिली.

गारगोटी तालुक्यातील वेणुग्राम येथील सव्यसाची गुरुकुलमच्या पथकाने लखन जाधव, श्रीकांत लुगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवकालीन मर्दानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके सादर केली. विद्यापीठाच्या जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, योगा, बॉक्सिंग आणि धनुर्विद्येच्या संघातील खेळाडूंनी नेत्रदीपक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील, किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. आय. एच. मुल्ला, डॉ. प्रशांत पाटील, सुभाष पवार, सुरेश धुरे, एन.आर. कांबळे उपस्थित होते.





कोल्हापूर : १) शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या क्रीडाज्योत प्रज्वलनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह क्रीडापटू. २) कोल्हापूरचे ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची सुप्रसिद्ध पोझ सादर करताना मल्लखांबपटू विद्यार्थी. (छाया : पप्पू अत्तार)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024
पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित सिंहावलोकन उपक्रमाचे सर्वसाधारण विजेतेपद मिळवलेल्या बेळगावच्या के. एल. एस. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एज्युकेशन अँड रिसर्च कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमवेत मान्यवर.

# विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित करणे काळाची गरज : डॉ. डेळेकर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थ्यांचे कौशल्ये विकसित होऊन त्यांच्या कलागुणांना वाव मिळणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सेंटर फॉर इनोव्हेशन इनक्युबेशन अँड लिंकेजसचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए विभागामार्फत आयोजित 'सिंहावलोकन २०२४' एकदिवसीय व्यवस्थापन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. आण्णासाहेब गुरव म्हणाले, स्वतःच्या विकासासाठी व पर्यायाने देशाच्या विकासासाठी विद्यार्थ्यांनी आत्मपरीक्षण करून आत्मविश्वासाने पुढे येणे महत्त्वाचे आहे. डॉ. एच. एम. ठकार यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. दीपा इंगवले यांनी आभार मानले.

डॉ. तेजेश्री घोडके, जयश्री लोखंडे व डॉ. परशराम देवळी यांची उपस्थिती होती. सिंहावलोकन उपक्रमाचे सर्वसाधारण विजेतेपद बेळगाव येथील के. एल. एस. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एज्युकेशन अँड रिसर्च कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पटकावले. उपक्रमात अधिविभागासह विविध १६ महाविद्यालयांतील २१० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024
पुढारी

# समुपदेशनाने अनुवंशिक आजार टाळता येऊ शकतात : डॉ. हेमा पुरंदरे

कोल्हापूर : अनुवंश समुपदेशनाने अनुवंशिक आजार टाळता येऊ शकतात, असे मत अनुवंशशास्त्र तज्ज्ञ डॉ. हेमा पुरंदरे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब वरूटे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. प्र- कुलगुरू प्रा. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पुरंदरे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्याकडे आलेल्या केसेस समजावून सांगितल्या व आनुवंशिकतेचा अभ्यास, चाचण्या करून त्यांचे निदान व समुपदेशन कसे केले जाते याची माहिती दिली. व्याखानमालेचे समन्वयक प्रा. डॉ. सुनील गायकवाड यांनी व्याख्यानमालेचा उद्देश विषद केला. प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. आण्णासाहेब गोफणे यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे, उज्ज्वला गोखले यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 MAR 2024
पुढारी

# शहाजी महाविद्यालयामध्ये गुरुवारी भारतीय अर्थव्यवस्थेवर राष्ट्रीय कार्यशाळा

कोल्हापूर : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात गुरुवारी (दि.७) ७५ वर्षांतील भारतीय अर्थव्यवस्था उपलब्धी व आव्हाने या विषयावर अर्थशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेमध्ये डॉ. हरिसिंग गौर सेंट्रल युनिव्हर्सिटी सागरचे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश कांबळे यांचे बीज भाषण होणार आहे. कार्यशाळेचे उद्‌घाटन श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव संगीता बोंद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. पहिल्या सत्रामध्ये कर्नाटक येथील केएलई युनिव्हर्सिटीचे डॉ. विनोद मगदूम मार्गदर्शन करतील. दुसऱ्या सत्रात शिवाजी कॉलेज सातारा येथील अर्थशास्त्र विभागातील प्रो. डॉ. अनिल कुमार वावरे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रोफेसर डॉ. व्ही. पी. कट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
05 MAR 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज : गायकवाड

गडहिंग्लज : जीवनामध्ये कोणत्याही गोष्टीचे व्यवस्थापन होणे गरजेचे आहे. त्याचे योग्य असे नियोजन करू शकतो. त्यासाठी आपण सर्वांनी व्यवस्थापन व नियोजनास महत्त्व दिले पाहिजे, असे प्रतिपादन विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास केंद्राचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले.



गडहिंग्लज : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. किसन कुराडे, डॉ. अनिल कुराडे व अन्य.

येथील शिवराज महाविद्यालयात कोल्हापूर जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. किसनराव कुराडे होते.

प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी स्वागत केले. डॉ. डी. पी. खेडकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आपत्ती व्यवस्थापनाचे स्वतंत्र कक्ष स्थापन केले आहे. याद्वारे प्रशिक्षण देऊन अनेक स्वयंसेवक घडवत आहे.

संस्थाध्यक्ष प्रा. कुराडे यांनी नव्या पिढीला समजण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाचा स्वतंत्र कोर्स सुरू करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने प्रयत्न करावेत, असे सांगितले. संस्था सचिव डॉ. अनिलराव कुराडे यांनी, विद्यापीठाचे पाठबळ मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी सत्यजित देसाई, दिनकर कांबळे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, संचालिका प्रा. बिनादेवी कुराडे, प्रा. के. बी. केसरकर, संजय पाटील, रविनंदन जाधव, डॉ. सरोज बिडकर, डॉ. संतोष शहापूरकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. डॉ. श्रद्धा पाटील यांनी सूत्रसंचालन, तर प्रा. गौरव पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 MAR 2024
सकाळ

# विद्यापीठातील २१ संशोधकांनी मिळविली २५ पेटंट

## कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते गौरव

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांमधील २१ संशोधकांनी गेल्या सहा महिन्यांत २५ पेटंट मिळविले आहेत. त्यामध्ये आफ्रिकन पेटंट मिळविणाऱ्या गायत्री उमेश गोखले या विद्यार्थिनीचा समावेश आहे. या संशोधकांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आज गौरविण्यात आले. 'गायत्री हिला विद्यापीठाची पेटंट ॲम्बेसीडर म्हणून नियुक्त करावे आणि तिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांतही संशोधन आणि पेटंटप्राप्ती या विषयी जागृती करावी', असे आवाहन कुलगुरूंनी केले.

विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेजेस केंद्रातर्फे विद्यापीठातील पेटंटप्राप्त संशोधकांचा गौरव करण्यात आला. त्यात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह डॉ. एस. एन. सपली, एस. पी. हांगिरगेकर, जी. बी. कोळेकर, एस. डी. डेळेकर, माधुरी वाळवेकर, ए. के. साहू, एस. बी. चव्हाण, सी. जे. आवटी, हर्षवर्धन पंडित, श्रेया पंडित, जे. बी. यादव, टी. डी. डोंगळे, के. डी. पवार, एन. एल. तरवाळ, डी. के. गायकवाड, सचिन पन्हाळकर, आर. जे. धाबर्डे, एच. ए. तिरमारे, श्रीपाल गायकवाड यांचा समावेश होता. डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले.



गायत्री गोखले

'आजचा दिवस ऐतिहासिक स्वरुपाचा आहे. विद्यापीठाची संशोधकीय कामगिरी उंचावत असल्याचे हे लक्षण आहे. शिक्षक आणि संशोधकांनी पेटंट मिळविणारी कामगिरी करणे अपेक्षितच आहे. मात्र, विद्यापीठात बी.टेक.च्या तृतीय वर्षात शिकणाऱ्या गायत्री गोखले हिला स्थानिक स्रोतांपासून तेथील समस्या सोडविण्याचे संशोधन करावेसे वाटणे आणि त्यामध्ये तिने पेटंट मिळविण्याची कामगिरी करणे आदर्शवत आहे.

पेटंटप्राप्त शिक्षकांनीही आपल्यातील एकेका शिक्षकाला संशोधनाला पेटंट प्राप्त करण्याच्या तांत्रिकतेविषयी अवगत करावे. महाविद्यालयीन शिक्षकांमध्येही या अनुषंगाने जागृती करणे आवश्यक असल्याचे कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बौद्धिक संपदा हक्क कक्षाचे प्रमुख डॉ. एस.बी. सादळे प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठातील पेटंटप्राप्त संशोधकांच्या गुणगौरवप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024
सकाळ

# डॉ. राशीनकर 'औद्योगिक रसायनशास्त्र' चे समन्वयक



डॉ. राशीनकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. जी. एस. राशीनकर यांची औद्योगिक रसायनशास्त्र विभागाच्या समन्वयकपदी नियुक्ती झाली आहे. त्याबाबतचे पत्र त्यांना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आज दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024
सकाळ



कळे : येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयात डॉ. प्रकाश पवार यांनी मार्गदर्शन केले. या वेळी डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, प्रभारी प्राचार्य डॉ. कमलाकर राक्षसे, प्रा. डॉ. नितीन पाटील, डॉ. शार्दुल सेलूकर आदी उपस्थित होते.

# दत्ता देशमुख राजकीय त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण : डॉ. पवार

## कळेतील पाटील महाविद्यालयात चर्चासत्र

कळे, ता. ४ : दत्ता देशमुख हे राजकीय त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. ज्यांची वर्तमान राजकीय परिस्थितीमध्ये नितांत आवश्यकता आहे. त्यांनी आपले आयुष्य हे असंघटित कामगार, शेतकरी, कष्टकरी व त्यांच्या संघटना बांधणीसाठी वेचले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासन केंद्र राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ व विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे राज्यशास्त्र विभाग यांच्यातर्फे आयोजित 'दत्ता देशमुख यांचे जीवन व कार्य' या विषयावर आयोजित एक दिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. प्र. प्राचार्य डॉ. कमलाकर राक्षसे होते.

पहिल्या सत्रात डॉ. नेहा वाडेकर यांनी दत्ता देशमुख यांचे विधानसभेतील भाषणे या विषयावरती मांडणी केली. दुसऱ्या सत्रात डॉ. सुखदेव उंदरे यांनी दत्ता देशमुख यांचे राजकीय जीवन या विषयावर मांडणी केली. याप्रसंगी डॉ. यू. एन. लाड, डॉ. नितीन पाटील, विद्यार्थी उपस्थित होते. या चर्चासत्रासाठी संस्थाध्यक्ष विठ्ठल पाटील यांचे सहकार्य लाभले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. शार्दुल सेलूकर यांनी प्रास्ताविक केले, प्रा. विक्रम यमगेकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

05 MAR 2024
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनावेळी विद्यापीठ संघातील खेळाडूंनी मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

05 MAR 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिवाजी विद्यापीठात शिवकालीन मर्दानी खेळाचा अभ्यासक्रम

## पुढील वर्षापासून सुरुवात ; कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची घोषणा : शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाला प्रारंभ

प्रतिनिधी

कोल्हापूर

भविष्याची गरज म्हणून शिवाजी विद्यापीठात २०२४–२५ या शैक्षणिक वर्षापासून मर्दानी खेळ प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात येणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे केली. शिवाजी विद्यापीठातील क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलात सोमवारी शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाला प्रारंभ केला. या महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. चार दिवस सुरु राहणाऱ्या महोत्सवात क्रिकेट, बास्केटबॉल, रस्सीखेच, बॅडमिंटन, कबड्डी, बुद्धीबळ, ॲथलॅटिक्स आणि मॅरेथॉन आदी स्पर्धा होणार आहे. शिवाजी विद्यापीठ कॅम्पसवरील १७५० विद्यार्थी–विद्यार्थिनी स्पर्धामध्ये प्रतिनिधीत्व करणार आहेत.





**कोल्हापूर : क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनावेळी विद्यापीठ संघातील खेळाडूंनी मल्लखांब व योगासनाची चित्तथरारक प्रात्याक्षिके सादर केली.**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पुरुषांमध्ये कौशल्य आणि महिलांमध्ये आत्मसन्मान, स्वसंरक्षणाची भावना रुजविण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने विशेष पाऊल उचलले आहे. त्याला मूर्त स्वरुप आणण्यासाठीच महाराष्ट्रात पुर्वापार रुजलेली शिवकालीन मर्दानी खेळांची परंपरा अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी–विद्यार्थीनींमध्ये रुजवण्याचा प्रयत्न आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासूनच प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने पदविका आणि पदवी अशा पद्धतीने अभ्यासक्रमांचा विस्तार करण्याचा मानस आहे. दरम्यान, डॉ. शिर्के यांच्या हस्ते रोपट्यास पाणी वाहून आणि ध्वजवंदन करून स्पर्धेचे उद्घाटन केले. यानंतर खेलो इंडिया गेम्समधील यशस्वी खेळाडूंनी आणलेली क्रीडाज्योत कुलगुरूंच्या हस्ते क्रीडा संकुलात उभारण्यात आली. तसेच स्पर्धेतील सहभागी विविध अधिविभागांच्या खेळाडूंनी संचलन करून मानवंदना दिली. शिवछत्रपती पुरस्कार विजेती खेळाडू स्वप्नाली वायदंडे हिने खेळाडूंना शपथ दिली. यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते खेलो इंडिया गेम्समधील क्रीडा स्पर्धामध्ये पदके मिळवत शिवाजी विद्यापीठाला देशात ११ वे स्थान प्राप्त करून देणाऱ्या खेळाडूंचा सत्कार केला. वेटलिफ्टर अपेक्षा ढोणे, मल्ल श्रावणी शेळके, जलतरणपटू पृथ्वीराज डांगे, नेमबाज सुमेध सासने अशी सत्कारमूर्ती खेळाडूंची नावे आहेत. विद्यापीठाच्या महिला रग्बी व मल्लखांब संघातील खेळाडूंसह प्रशिक्षक दीपक पाटील, अर्जुन पिटुक, डॉ. सी. एस. गिरी यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. आय. एच. मुल्ला, डॉ. प्रशांत पाटील, सुभाष पवार, सुरेश धुरे यांच्यासह सविता भोसले व मनिषा शिंदे उपस्थित होत्या. यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील आणि किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

0 5 MAR 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अशी करतात..मोत्यांची शेती..!

अहिल्या परकाळे
कोल्हापूर


स्वाती नक्षत्रातील पावसाचा थेंब समुद्रातील शिंपल्यांनंतर पडल्यानंतर त्यातून मोती तयार होतात, असे म्हटले जाते, परंतु शास्त्रीयदृष्ट्या शिंपल्यात घनपदार्थ गेल्यानंतरच मोती तयार होतो. त्यामुळे मोत्यांची शेती करताना गोड्या पाण्यातील शिंपले आणून पाच दिवस त्यांचे प्री–ऑपरेटीव्ह केल्यानंतर शिंपल्यांची शस्त्रक्रिया करून त्याच्यात न्युक्लेस सोडले जातात. त्यानंतर शिंपल्यांतून विशिष्ट स्राव बाहेर पडतो. त्यावर 'नेकर सिक्रेट" केल्यानंतर मोती तयार होतो. करवीर तालुक्यातील सडोली दुमाला येथे दिलीप कांबळे यांनी मोत्याची शेती साकारली आहे.



दिलीप कांबळे

दहावी पास असलेले कांबळे २०१८ पासून सोप्या पद्धतीने एक्स्पोर्ट मोत्यांची शेती करून लाखो रूपये उत्पन्न घेतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठात मोती मिळवण्याचे केंद्र उभारले आहे. मोत्यांच्या शेती संदर्भात त्यांनी 'तरूण भारत संवाद'ला माहिती दिली.

मोत्यांची शेती १० बाय १० च्या जागेत किंवा टेरेसवरही करता येते. मोत्यांच्या ५२ प्रकारच्या प्रजाती आहेत. पण भारतात ३ प्रकारच्या प्रजातीचे मोती पिकवले जातात. गोड्या पाण्यातील शिंपले आणून पाच दिवस त्यांची प्री–ऑपरेटीव्ह काळजी घेतली जाते. त्यानंतर शिंपल्यांवर शस्त्रक्रिया करून त्यात न्युक्लेस सोडले जातात. त्यांची तीन महिन्यांनी पाहणी करून मोती तयार होतो का, पहावे लागते. शिंपल्यांना शेवाळ, लॅमेलेडिंग, पेरीशिया कोरूटागा खाद्य दिले जाते. मोती तयार होण्यासाठी १ ते २ वर्षे लागतात. डिझायनर मोती १२ महिने, एमओपी मोती १८ महिने, अनियमित मोती २४ ते ३० महिन्यांचा कालावधी मोतीचे उत्पन्न येण्यासाठी लागतो.



- सडोली दुमाला येथे दिलीप कांबळे पिकवतात शेतात मोती
- इच्छाशक्तीच्या बळावर त्यांनी फुलवला मोती शेतीचा व्यवसाय

शिंपल्यांचे ऑपरेशन करून त्यांना गोड्या पाण्यात ठेवले जाते. पाण्याच्या क्षमतेप्रमाणे शिंपले सोडले जातात. वारंवार पाण्याची तपासणी करून त्यांना हिरवे शेवाळे दिले जाते. दीड वर्षानंतर मोती बाहेर काढल्यानंतर मोत्यावर प्रक्रिया करून, कटींग, पॉलिशिंग फिनिशिंग केले जाते. त्यानंतर मोत्यांची विक्री केली जाते.

**वार्षिक उत्पन्न ४ ते ५ लाख**

वीज महावितरणमधील नोकरी सांभाळत ते मोत्यांची शेती करतात. २०१५ मध्ये सुरूवातीला यात तोटा झाला. परंतु त्यांनी सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फ्रेश वॉटर एक्वाकल्चर (CIFA), चे प्रशिक्षण ओडिशात पूर्ण केले. २०१८–२०१९ मध्ये ५ हजार आणि १८ हजार ५०० मोती सेटअप केले आणि न डगमगता मेहनत केली. या मोत्यांना २०२१ मध्ये प्रति मोती २ हजार रुपये दर मिळाला. तसेच ४ ते ५ लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळत आहे.

**वेगवेगळ्या डिझाईनच्या मोत्यांची शेती**

डिझाईनचे वेगवेगळ्या आकारात मोती पिकवत असल्याने त्यांना चांगला दर मिळत आहे. आजतागायत नोकरी सांभाळत ते मोत्यांची शेती करत आहेत जागतिक दर्जाच्या एका मोत्याची किंमत ४०० ते २ हजार रूपयांपर्यंत आहे. शेतकऱ्यांनी मोत्यांची शेती करावी म्हणून



तरुण भारत संवाद
विशेष वृत्त

देशातील १५० शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. भारतात १७ ठिकाणी मोत्यांची शेती प्रकल्प सुरू आहेत.

**मोत्याची शेतीवर पुस्तक लवकरच....**

दहा बाय दहाच्या जागेत तलाव तयार करून त्यामध्ये मोत्यांची शेती करता येते. घरच्या घरी ६ फुटाची गोड्या पाण्याची टाकी बनवून त्यामध्ये मोती उत्पन्न घेता येते. मोत्यांची शेती कशी करायची, यासंदर्भात विद्यापीठामार्फत लवकरच पुस्तक प्रकाशित केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024
तरुण भारत

# बीबीए, बीसीएची नोंदणी बंधनकारक

पुणे : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) आगामी शैक्षणिक वर्षासाठी व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन (बीसीए) अभ्यासक्रमांची नोंदणी बंधनकारक केली आहे. या नोंदणी प्रक्रियेसाठी देशभरात शंभर सुविधा केंद्रांची निर्मिती केली असून, अभ्यासक्रम मान्यतेसाठी ७ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आतापर्यंत व्यवस्थापनशास्त्र पदवी (एमबीए) आणि संगणक उपयोजन (एमसीए) या अभ्यासक्रमांना एआयसीटीईची मान्यता घ्यावी लागत होती. हे अभ्यासक्रम राबवणाऱ्या संस्थांनाही मान्यता घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर ही मान्यता प्रक्रिया सुरू करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2024

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स संघाची नेत्रदीपक कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

गोवाहाटी (आसाम) येथे सुरु आसलेल्या चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स खेळाडूंनी ४ सुवर्ण, ३ रौप्य व १ कास्य अशी एकुण ८ पदकांची कमाई करुन आपला दबदबा निर्माण केला.

विजयी खेळाडूचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के , प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण डॉ. शरद बनसोडे, यांनी अभिनंदन केले.

खेळाडूंसोबत प्रशिक्षक म्हणून प्रा. आर. टी. पाटील, डॉ. इब्राहिम मुल्ला, डॉ. सविता भोसले यांनी काम पाहिले. याच बरोबर एथलेटिक्स प्रशिक्षक सुभाष पवार, सुनील बाबर, अभिजित महस्कर यांचे सहकार्य लाभले.

**पदक विजेते खेळाडू**

सुदेशना शिवणकर - १०० मी. धावणे सुवर्ण पदक व २०० मी.धावणे रौप्य पदक. रेश्मा केवठे १०००० मी. सुवर्ण पदक. अभिजीत भोसले- डेक्याथलॉन सुवर्णपदक. कुशल मोहिते- डेक्याथलॉन सुवर्णपदक. विकास खोडके ११० मी. हर्डल्स रौप्यपदक.

अनुश्का कुंभार ४०० मी. हर्डल्स कांस्य पदक. ४०० मी. सिक्स रीले रौप्य पदक, खेळाडू : प्रतिक पाटील, रिया पाटील, राजवर्धन पाटील, अनुष्का कुंभार, प्रतीक पाटील. २००मी. धावणे चतुर्थ क्रमांक: अनुष्का कुंभार. १०० मी. रीले पाचवा क्रमांक : प्रतीक पाटील, विकास खोडके, अखिल खोत, सार्थक शेलार.